# रुढी परंपरेप्रमाणे चांगले वागून सुध्दा...!

दैनंदिन जीवनात अनेकप्रकारची कामे करताना विशेषतः धार्मिक स्वरुपाची कामे म्हणजे पूजा-अर्चा कुलधर्म कुलाचार इत्यादी करीत असताना बऱ्याचवेळा शास्त्रापेक्षा रुढी-परंपरा यांना महत्व देऊन विसंगत गोष्टी केल्या जातात. शास्त्राप्रमाणे जे वागतात किंवा आचरण करतात त्यांच्या विरुध्द आचरण चुकीच्या रूढी-परंपरानुसार करतात.

उदाः माता किंवा पिता यांचे निधनानंतर एकवर्षाचे आत मंगलकार्य करु नये असे शास्त्र असताना रुढी मात्र याचे उलट आहे. एकवर्षाचे आत मंगलकार्य केले नाही तर पुढे तीन वर्षे मंगलकार्य करता येत नाही अशी रुढी जपणारे अनेक लोक आहेत. या रुढीचे पालन करण्यासाठी अट्टाहासाने आपल्या मुलाचे किंवा मुलीचे लग्न ठरविले जाते. कदाचित पसंत नसताना पुढे तीन वर्षे करता येत नाही अशी भिती दाखवून एकवर्षाचे आंत लग्न केले जाते आणि संसार सुखाचा झाला नाही तर दोष कोणाला तरी लावला जातो किंवा शास्त्रानुसार एक वर्षा नंतर व्यवस्थितपणे पत्रिका पाहून विवाह झाल्यावर सुध्दा संसार सुखाचा होतो असे नाही. मग असा विचार मनात येतो की आम्ही चांगले वागून म्हणजे शास्त्रानुसार वागून सुध्दा असे का होते ?

अशा प्रकारच्या रुढी-परंपरा मंगलकार्यात खूप असतात. तसेच देवांची पूजा, उत्सव, सण, व्रते, श्राध्द, पक्ष इत्यादी अनेक धार्मिक कार्यात प्रत्येक समाजात, वेगवेगळ्या गावात भिन्नप्रकारच्या चालीरीति असतात. अशा चुकीच्या किंवा कालबाह्य चालीरीति बदलण्यास माणसे तयार होत नाहीत. कारण रुढी-परंपरा - चालीरीति पेक्षा वेगळे काही केल्यास कोप होईल कां ? कांही अनिष्ट घडेल कां ? या भितीने शास्त्रापेक्षा विसंगत अशी कर्मे केली जातात.

अर्थात शास्त्राप्रमाणे वागणारा किंवा चुकीच्या रुढी-परंपरेप्रमाणे वागणारा जीवनात चांगले वागत असेल आणि त्याच्या मनाप्रमाणे घडत नसेल तेव्हा ती व्यक्ती संभ्रमित होते आणि मी देवाचे, तसेच कुलधर्म-कुलाचाराचे आचार व्यवस्थित करुन सुध्दा असे कां होते ? माझ्या मनासारखे कां होत नाही ? असा विचार करते त्यावेळेस मी चांगले वागून सुध्दा असे कां होते असा विचार मात्र मनात येत नाही.

म्हणजे शास्त्राप्रमाणे वागणे किंवा रुढी-परंपरेप्रमाणे आचरण करणे आणि आपण स्वतः चांगले वागणे यामध्ये खूप फरक आहे. चांगले वागणे म्हणजे **परोपकाराय पुण्याय पापाय परपीडनम्** असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. पाप-पुण्याच्या व्याख्येत चांगले वागणे ते सुध्दा सापेक्ष आहे. तरीसुध्दा परीणामांनी स्वतःला किंवा इतरांना चांगले फळ मिळवून देणारे वागणे म्हणजे चांगले वागणे होय. आपण स्वतः अशा प्रकारे चांगले वागवयाचे ठरविले तरी समोरच्या व्यक्तीकडून किंवा समाजाकडून त्याची उपेक्षा केली जाते आणि पुनः मूळ पदावर येतो. चुकीच्या रुढी-परंपरा सोडून शास्त्रसंमत विचार घेऊन आचरण करावयाचे ठरविले तर समाजाला ते मान्य होत नाही आणि कुटुंबाच्या, समाजाच्या अनाठायी आग्रहामुळे पुनः पूर्वी प्रमाणेच आचरण करण्यास भाग पडते. अशा परिस्थितीतसुध्दा आपण **परोपकाराय पुण्याय** या विचाराने आपले आचरण ठेवले तर मी चांगले वागून सुध्दा मनाविरुध्द कां होते हा विचार मनात येणार नाही.

मात्र ९९टक्के लोक चांगले वागण्यापेक्षा मी देवा धर्माचे खूप करतो. कुलधर्म-कुलाचार, श्राध्द,पक्ष इत्यादी नियमीतपणे करतो तरीसुध्दा, संकटे, चिंता, काळजी इत्यादी मुळे मला त्रास होतो असे म्हणत असतात, अशा व्यक्ती गरीब, श्रीमंत, स्त्री, पुरुष कोणत्याही धर्मातील असतात. म्हणजे चांगले वागणाऱ्यांना तसेच देवाधर्माचे करणाऱ्यांना दोघांनाही अशा संकटांना तोंड द्यावे लागतेच. अशा वेळेस शेवटी पुनः पूर्वसुकृताचा, कर्मविपाकाचाच विचार मनात येतो आणि माणूस दैवाला, नशीबाला दोष देत पापभीरु वृत्तीने पुनः आपल्या रुढी-परंपरा सांभाळीत कर्म करीत राहतो. कारण या कर्माचे फळ पुढीलजन्मी तरी चांगले मिळेल. अशी त्याला आशा असते. अर्थात रुढी-परंपरेप्रमाणे धार्मिक कृत्ये करणे म्हणजे चांगले वागणे नव्हे. ही गोष्ट सर्वांनी लक्षात ठेवली पाहिजे.

**- मोहन धुं. दाते**